अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर दि.27/07/2021

घनकचरा व्यवस्थापन विभाग

निविदा सुचना जाहिरात क्र.06 सन 2021-22

अहमदनगर महानगरपालिका मा.आयुक्त यांच्या दि.19/07/2021 रोजीच्या मंजूरीने घनकचरा व्यवस्थापन विभागाकरीता स्वच्छ भारत अभियान व माझी वसुंधरा अभियानाची अंमलबजावणी साठी त्रयस्थ संस्थेची नेमणुक करणेकामी प्रति महिना दर निश्चिती करुन संस्था/एजन्सीची नियुक्ती करणेकामी देय दराच्या निविदा मागविण्यात येत आहे.

| Sr.No | Envelopes | Start Date & Time | Expiry Date & Time |
|---|---|---|---|
| 1 | निविदा विक्री | 27-07-2021 : 18:00 | 09-08-2021 : 17:00 |
| 2 | निविदा स्विकृती | 09-08-2021 : 17 :01 | 10-08-2021 : 17:00 |
| 3 | तांत्रिक लिफाफा उघडणे | 10-08-2021 : 17:01 | 11-08-2021 : 17:00 |
| 4 | व्यापारी लिफाफा उघडणे | 11-08-2019 : 17:01 | 12-08-2021 : 17:45 |

| कामाचा तपशिल | कामाची कालावधी | निविदा फॉर्म रक्कम रु. | बयाणा रक्कम रु. | शेरा |
|---|---|---|---|---|
| घनकचरा व्यवस्थापन विभागाकरीता स्वच्छ भारत अभियान व माझी वसुंधरा अभियानाची अंमलबजावणी साठी त्रयस्थ संस्थेची नेमणुक करणेकामी प्रति महिना दर निश्चिती करुन संस्था/एजन्सीची नियुक्ती करणे बाबात | एक वर्ष | रु.1000/- | रु.9,000/- | |

अटी - शर्ती

1) सदर कामाबाबत निविदा अटी शर्ती इ बाबतचा सर्व तपशील निविदा संचामध्ये व जाहिर टेंडर नोटीसमध्ये नमुद केलेला असुन निविदा संच मनपा वेबसाईटवर पहावयास उपलब्ध आहे.

2) सदर कामाची निविदा संच खरेदी किंमत व बयाणा रक्कम घनकचरा व्यवस्थापन विभागाकडे भरावी.

3) निविदा फॉर्म विक्री फक्त वरील प्रमाणे वेळेतच घनकचरा व्यवस्थापन विभागाकडे चालु राहील.मुदती नंतर फॉर्म विक्री होणार नाही.

4) वरील निविदा सादरीकरण /स्विकृती फक्त घनकचरा व्यवस्थापन विभागाकडे करण्यात येईल.पेटी पध्दत नुसार स्विकारण्यांत येईल.

5) निविदा सादरीकरण हे दोन पाकीट पध्दतीने(Technical व Commercial bid) करणे आवश्यक आहे.

6) निविदा उघडण्याच्या अखेरच्या दिवशी कार्यालयीन सुट्टी असल्यास निविदा पुढील कार्यालयीन दिनांकास उघडण्यात येईल.

7) निधि उपलब्धतेनुसार देयक अदा करण्यात येईल.

8)कोणतीही निविदा स्वीकारणे,नाकारणे अथवा रद्द करणे याबाबतचे अंतिम अधिकार मा.आयुक्त,अहमदनगर महानगरपालिका यांना राहतील.

9)<u>सिलबंद तांत्रिक लिफाफा क्र.1</u> पुढील कागदपत्रे असतील

1)संस्था नोंदणी प्रमाण पत्राची साक्षांकित प्रत.

2) पॅनकार्ड..

3)ई.एस.आई.सी.नोंदणी प्रमाणपत्र

4)ई.पी.एफ.नोंदणी प्रमाणपत्र.

5)जी.एस.टी. नोंदणी प्रमाणपत्र.

6)संबंधीत विषयाचे काम केल्याचा अनुभव,क्षमता बांधणी अंतर्गत प्रशिक्षण अनुभव.

7)सत्य प्रत बयाणा रक्कम भरल्याची पावती.

10)<u>सिलबंद दराचा लिफाफा क्र 2</u>

अ)आपले दर पत्रक मध्ये दर नमुद असलेली कागदपत्रे.

ब)संबंधीत संस्था/एजन्सीने निविदा संचामधील दर नमुद करुन स्वाक्षरी करुन सोबत जोडणे आवश्यक आहे.

क)दाखल केलेली दरपत्रके ही सर्व कराचा अंतर्भाव करून दाखल करावी.उदा. कस्टम,एक्साईज,जकात,सेलटॅक्स,सीएस,टी व इतर लागु असलेले कागद पत्रे.

11)अटीयुक्त निविदा विचारात घेतली जाणार नाही

12)यशस्वी ठेकेक़दारास योग्य किंमतीच्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करुन द्यावा लागेल.

13)यशस्वी ठेकेदारास कामगार विमा कार्यारंभ आदेश पुर्वी सादर करावा लागेल.

14)यशस्वी ठेकेदारास कामापोटी 3% (टक्के) अनामत रक्कम रोखीने भरावी लागेल किंवा कार्यारंभ आदेश पुर्वी सेव्हिंग बँक डिपॉझिट गव्हर्रमेंट प्रॉमिसरी नोटस किंवा नॅशनल सेव्हिंग सर्टीफिकेट स्वरुपामध्ये महानगरपालिकेच्या नावे करुन दिलेल्या असल्यास स्विकारण्यात येईल.

15)निविदा विक्रीच्या शेवटच्या दिवशी संच प्राप्त न झाल्यास व स्विकृती च्या शेवटच्या दिवशी सादरीकरण न झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी निविदा धारकाची राहील.

16)सर्व कागदपत्रे अनुक्रमांक टाकुन दाखल करावीत.

17)निविदा उघडण्याच्या अखेरच्या दिवशी कार्यालयीन सुट्टी असल्यास निविदा पुढील कार्यालयीन दिनांकास उघडण्यात येईल.

18)कोणतीही निविदा स्वीकारणे,नाकारणे अथवा रद्द करणे याबाबतचे अंतिम अधिकार मा.आयुक्त,अहमदनगर महानगरपालिका यांना राहतील.

19)तांत्रिक लिफाफातील कागदपत्रे तांत्रिक छाणनी समितीने समोर तपासणीच्या वेळी निविदाधारक किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी यांनी निविदे मध्ये तांत्रिक लिफाफ्यात जोडलेल्या कागद पत्राचे मुळ प्रती सादर कराव्या .

20निविदाकाराने निविदा दाखल केल्यानतंर जेव्हा मनपा आर्थिक दर लिफाफा उघडेल त्यानंतर दराबाबत कोणतेही फेंर फार किंवा त्याबाबत पत्र सादर करता येणार नाही कदाचित एखाद्या निविदाकाराने निविदा मुदत नंतर असे दर सादर केल्यास त्याचा विचार केला जाणार नाही.

26/07/24

उपायुक्त,(कर)

अहमदनगर महानगरपालिका

T.No. मृत जनावरे विल्हेवाट

निविदा फॉर्म:

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर घनकचरा व्यवस्थापन विभाग

दर पत्रक

| कामाचा तपशील् | कामाचा कालावधी | निविदाकाराने सर्व करासहीत नमुद करावयाचे दर रक्कम रुपये प्रति महिना ठोक रक्कम | शेरा |
|---|---|---|---|
| घनकचरा व्यवस्थापन विभागाकरीता स्वच्छ भारत अभियान व माझी वसुंधरा अभियानाची अंमलबजावणी साठी त्रयस्थ संस्थेची नेमणुक करणेकामी प्रति महिना दर निश्चिती करुन संस्था/एजन्सीची नियुक्ती करणे बाबात | एक वर्ष | प्रति महिना ठोक दर रक्कम रु.<br><br>(अक्षरी:- | |

निविदाच्या अटी व शर्ती मला मान्य असुन त्या प्रमाणे निविदा दर भरुन सादर करीत आहे.

निविदाधारकाची स्वाक्षरी व शिक्का
नाव:-
पत्ता:-

उपायुक्त (कर)
अहमदनगर महानगरपालिका

## कामाचा तपशील :-

१. SWM नियम २०१६ अंमलबजावणी तसेच स्वच्छ भारत अभियानाच्या अंमलबजावणी साठी अहमदनगर महानगरपालिकेला सांभाळणी व हाताळणी करणे.

२. एक तज्ञ व्यक्ती स्वच्छ सर्वेक्षण च्या पाठिंबा व दस्तऐवजीकरणासाठी अहमदनगर महानगरपालिका येथे पूर्ण वेळ उपलब्ध करुन देणे.

३. पुढील कृती आराखड्याचा आढावा घेण्यासाठी आणि रणनिती ठरविण्यासाठी अहमदनगर महानगरपालिकेला क्षेत्र भेटी व्दारे संस्थेकडुन सल्लागार सहाय्य प्रदान करणे.

४. राज्य व केंद्र अभियान कार्यालयातील निर्देशांची अंमलबजावणी करण्यासाठी अहमदनगर महानगरपालिकेला सहाय्य करणे.

५. दस्तऐवजीकरण, MIS अद्यतनित करणे आणि इतर सर्व SBM संबंधित पोर्टलवरील माहिती भरण्यासाठी सहाय्य करणे.

६. अहमदनगर महानगरपालिकेला पाठिंबा देण्यासाठी SBM ने सुचविलेल्या नाविन्यपुर्ण उपक्रम राबविण्यासाठी सिंगल युज प्लास्टीक (SUP) चा वापर कमीत कमी करण्यास बंदी घालण्याची रणनिती आखणे.

७. घनकचरा व्यवस्थापनासाठी डेटा व्यवस्थापनात अहमदनगर महानगरपालिकेला पाठिंबा देणे.

८. माझी वसुंधरा अभियानाच्या मार्गदर्शक तत्वानुसार पृथ्वी, अग्नी,जल, वायु आणि आकाश या तत्वांचा अभ्यास करुन अहमदनगर महानगरपालिका हद्दीत त्याची अंमलबजावणी करणेकरिता मार्गदर्शन करणे.

९. माझी वसुंधरा अभियानाच्या मार्गदर्शक तत्वानुसार पृथ्वी, अग्नी,जल, वायु आणि आकाश या तत्वांचा अभ्यास करुन अहमदनगर महानगरपालिकेच्या सर्वोच्च गुण कागदपत्रे बनविणे.

१०. माझी वसुंधरा अभियानाची दर महिन्याची माहिती माझी वसुंधरा अभियानाच्या MIS पोर्टलवर भरणे.

११. माझी वसुंधरा अभियानाशी संबंधित योजना जसे की वन महोत्सव, राष्ट्रीय जल अभियान, ग्रीन इंडीया मिशन, National Clean Air Program इत्यादी योजनांच्या प्रभावी अंमलबजावणी करिता मार्गदर्शन करणे.

१२. माझी वसुंधरा अभियानाला अनुसरुन कृती आराखडा तयार करणे.

१३. माझी वसुंधरा अभियानाच्या निकषानुसार घनकचरा व्यवस्थापन विभागासाठी मार्गदर्शन करणे.

१४. माझी वसुंधरा अभियान निकषानुसार पृथ्वी, अग्नी, जल, वायु आणि आकाश या घटकांनुसार महानगरपालिकेच्या विविध विभागांना सुचना देणे.

१५. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, माझी वसुंधरा अभियान, राष्ट्रीय हरित लवाद, केंद्रीय हरित लवाद चे ऑनलाईन Dashboard माहिती प्रशिक्षण.

१६. अभियानाच्या दृष्टीने शहराच्या सद्य परिस्थितीचे योग्य विश्लेषण करुन त्याबाबतीत योग्य तो आराखडा तयार करणे.माझी वसुंधरा अभियाना संदर्भात योग्य दृष्टी आणि ध्येय निर्माण करणे.

१७.माझी वसुंधरा अभियान योग्य रणनीती तयार करणे आणि संबंधित क्रिया करणे आणि टिकावे यासाठी उपाय करणे.

१८.<u>प्रशिक्षण प्रोग्राम</u> - SWM , माझी वसुंधरा अभियान अंमलबजावणी करणारेधिकारी/ युएलबी कर्मचारी यांचे घनकचरा व्यवस्थापन चे SWM तज्ञांकडुन कालावधीचे प्रशिक्षण प्रोग्राम घेणे.

१९.माझी वसुंधरा अभियानाशी संलग्न सगळी कामे करणे.

## नियम व अटी :-

१. निविदेत संपूर्ण करासहीत व पोहोच खर्चासहीत दर भरावेत.
२. निविदा मंजुर झाल्यावर निविदा धारकास स्वखर्चाने शासकीय नियमानुसार योग्य त्या किंमतीच्या मुद्रांकावर करारनामा करुन द्यावा लागेल.
३. निविदा धारकाने निविदा भरणेपूर्वी बयाणा रक्कम रु. ९,०००/- रोख भरावी लागेल व निविदेच्या पाकीटावर पावती क्रमांक तारखेसह लिहीणे बंधनकारक राहील.
४. निविदा लिफ़ाफ़ा क्र. १ मध्ये पॅन कार्ड, संस्था नोंदणी प्रमाणपत्र, ई.एस.आई.सी. नोंदणी प्रमाणपत्र, ई.पी.एफ़. नोंदणी प्रमाणपत्र, जी.एस.टी. नोंदणी प्रमाणपत्र, संबंधीत विषयाचे काम केल्याचा अनुभव, क्षमता बांधणी अंतर्गत प्रशिक्षण अनुभव इ.ची सत्यप्रत व बयाणा रक्कम भरल्याच्या पावतीची सत्यप्रत जोडणे आवश्यक आहे. लिफ़ाफ़ा क्र. २ मध्ये निविदा दर असणे आवश्यक आहे.
५. महानगरपालिकेच्या मागणीनुसार व निविदेतील दराप्रमाणे कामे करावे लागतील तसे न झाल्यास व सेवेत कोणतीही कमतरता आढळल्यास करार एकतर्फ़ी रद्द करण्याचा अधिकार खालील सही करणार यांनी राखुन ठेवला आहे. तसेच भरलेली अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.
६. सदरील कामाची देयके उपलब्ध निधीनुसार दरमहा १२ महिन्यात अदा करण्यात येतील.
७. शासकीय नियमानुसार आयकर व इतर कपाती करण्यात येतील.
८. जिल्हा अहमदनगर यांच्या न्याय कक्षेत.
९. कोणतीही निविदा अंशत: अथवा पूर्णपणे स्विकारणेचा अथवा नाकारणेचा अधिकार महानगरपालिकेने राखुन ठेवला आहे.
१०. निविदाकाराने देयक मागणी करतेवेळी झाल्या कामाचे तपशील देणे आवश्यक आहे.त्याच प्रमाणे कर्मचारी भविष्य निर्वाह निधी भरले शिवाय देयक अदा केले जाणार नाही.
११. काम करतेवेळी उपलब्ध करुन दिलेला कर्मचारी यांचे काही अपघात झाल्यास त्याची जबाबदारी संबंधीत संस्थेची राहील अहमदनगर महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.
१२. पुरवठादारास वरील अटी व शर्ती मान्य असल्यास निविदा भरावी.

26/07/21

उपायुक्त (कर)
अहमदनगर महानगरपालिका